# <u>दीक्षा</u>

त्रिकोणी एक तुकड्यासाठी
त्यातील सखोल गर्तेपायी
युगे युगे स्त्री गेली गांजिली
पौरुषी ईर्षा कामास आली

मानवासह  प्रत्येक प्राणी
धावतो योनिमागे तारुण्यी
करीता न पर्वा स्वप्राणाची
देई घेई प्राणही तो क्षणार्धी

केवळ  प्रजोत्पादनासाठी
असेल का ओढ दुर्धर ही
उमगले  गूढ हे  बुद्धासी
दीक्षा संयमाची त्याने दिली

- नारायण
०७/१/१२